JDHEP-12011(19)/13/2025-PAY UNIT/GPF & NPS

I/995502/2025

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण,कोकण विभाग,पनवेल

शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर,पनवेल,जि.रायगड -४१०२०६

ई-मेल पत्ता :- jtdirc.111@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४६१४२०)

क्र.विसस उशि/कोविप/शिष्यवृत्ती/मुला-डिबीटी/२०२४-२५/२५/ दि.

प्रति,

प्राचार्य/संस्था प्रमुख,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित,
कला,वाणिज्य,विज्ञान, विधी, व अध्यापक महाविद्यालये,
जिल्हा- रायगड, पालघर, ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

K.M.E. Society's G. M.Momin Women's College ★ Bhiwandi ★
INWARD NO. 58
DATE 12/03/25
SIGN.

**विषय:-** राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षाशुल्काचा ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ देण्यासाठीच्या शासन निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत...

संदर्भ :- १.संचालनालयाचे पत्र दि.१२/०७/२०२४, दि.२३/०७/२०२४
२.शासनपत्र क्र.विबाक-२०२५/प्र.क्र.१८/तांशि-४, दि.३० जानेवारी २०२५
३.संचालनालयाचे पत्र क्र.उशिंस-शिष्य/२०२४-२५/मुमोशि/E-९७१००६ दि.०३.०३.२०२५

**(संदर्भीय परिपत्रकाचे अवलोकन व्हावे.परिपत्रक सोबत जोडले आहे.)**

उपरोक्त विषयान्वये सूचित करण्यात येते की, शासन निर्णय दि. ०८.०७.२०२४ अन्वये राज्यातील शासकीय महाविदयालये, शासन अनुदानित अशासकीय महाविदयालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविदयालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विदयापीठे , शासकीय अभिमत विदयापीठे (खाजगी अभिमत विदयापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विदयापीठे वगळून) व सार्वजनिक विदयापीठांतर्गत येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process- CAP) (व्यवस्थापन कोटयातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विदयार्थ्यांपैकी , ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील , इतर मागास प्रवर्गातील , सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या मुलींना उच्च शिक्षणसाठी शिक्षण शुल्क व परीक्षाशुल्काचा ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ देण्यासाठी लाभ मंजूर करण्यात आलेला आहे.

तरी विदयार्थीनींना , मुलींना मोफत शिक्षण योजनेची सविस्तर माहिती महाविदयालयीन स्तरावरून देण्यात यावी तसेच मुलींना मोफत शिक्षण योजनेची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी सदर योजनेची सर्वसाधारण माहिती सर्व महाविदयालयाने त्यांच्या संकेतस्थळ / नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावेत व जास्तीत जास्त विदयार्थीनी शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज , आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करून प्रस्तुत कार्यालयास शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन सादर करण्यात यावे व सदर योजनेबाबत आपल्या महाविदयालयाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात यावा.

Signed by Vijay Pandurang Narkhede
Date: 10-03-2025 18:39:41

(सोबत सहपत्रे)

(डॉ.विजय नारखेडे)
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग,पनवेल

प्रत:- मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे यांना माहितीस्तव सादर.

To be displayed on notice board.
& website.
19/3/25

CS Scanned with CamScanner